CMYK

सायं.दैनिक
बीड **किसान**
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ■ वर्ष ६ ■ अंक ८२ ■ मंगळवार, दि. २८ जुलै, २०२६ ■ पोस्टल दिनांक २९ जुलै, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-6 ■ Issue-82 ■ Tuesday 28 July, 2026 ■ Postal Date 29 July, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2


## बसस्थानकात महिलेची सोनसाखळी चोरणाऱ्या दोघांना अटक; मुद्देमाल जप्त

माजलगाव (किसान न्युज): माजलगाव नवीन बस स्थानकावर बसमध्ये चढत असलेल्या एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या दोन चोरट्यांना पोलिसांनी गजाआड केले आहे. सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याची उकल करत चोरीला गेलेला ऐवजही जप्त केला आहे. सखूबाई मुरलीधर गायकवाड (वय ७०, रा. वाघोरा, ता. माजलगाव) या १५ जुलै रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास माजलगाव येथील नवीन बस स्थानकातून एका बसमध्ये चढत होत्या. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत हातोहात लांबवली होती. या प्रकरणी सखूबाई गायकवाड यांच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# रोहित पवार म्हणाले पैशाने पेपर विकतघेऊन एखादा औषध निरीक्षक झाला तर तो प्रामाणिक काम करेल का

## एमपीएससी, टीईटी पेपर फुटीचे प्रकरण बाहेर काढले असून, याबाबत पुरावे असल्याचा दावा केला यामुळे राज्य सरकारही आता 'बॅक फुटवर' गेल्याचे दिसते

### आका कोण

खरी प्रश्नपत्रिका आणि फुटलेल्या पेपरची कॉपी दाखवली. १०० पैकी ९० प्रश्नांची कॉपी देण्यात आलेली होती.नीट परिक्षेत जसा पेपर सेट करणारी व्यक्ती फुटली तसाच हा पेपर सेट करणारी व्यक्ती फुटलेली आहे मग त्याचा आका कोण आहे हे शोधायला हवे असं रोहित पवार म्हणाले.

**बीड । किसान न्युज**

सध्या देशात नीट पेपर फुटी वरुन रणकंदन सुरू असून, यासाठी विद्यार्थ्यांनी दिल्ली येथे आंदोलन केल्याने केंद्रीय शिक्षण मंत्र्याची विकेट पडली आहे. याप्रकरणी आता महाराष्ट्रात ही एमपीएससीच्या माध्यमातून घेतली जाणारी औषध निरीक्षक भरती परीक्षा प्रश्नपत्रिका पेपर फुटी प्रकरणी रोहित पवार यांनी लक्ष केंद्रित करीत. यासह टीईटीचा पेपर एक दिवस आधी फुटला. नीटचा पेपर दोन दिवस आधी फुटला. एसआरपीएफचा पेपरही फुटला. एचएससी केमिस्ट्रीचा पेपरही एक दिवस आधी फुटला. औषध निरीक्षक परीक्षेचा पेपरही फुटलेला आहे. असे बोलत याप्रकरणी गंभीर आरोप करीत खळबळ उडवून दिली आहे. रोहित पवार यांनी त्यांच्याकडे पुरावे असल्याचा सुद्धा दावा केला आहे. यामुळे रोहित पवार आता महाराष्ट्राचे 'जेन झी' ठरत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. त्यांचा आरोपांवर खुलासा करता न आल्याने राज्य सरकारही आता 'बॅक फुटवर' गेल्याची चर्चा राज्यभर सुरू आहे.

यावर बोलताना रोहित पवार म्हणाले की, पैसे देऊन एखादा पेपर विकत घेऊन एखादा औषध निरीक्षक झाला असेल तर तो प्रामाणिक काम करेल का ? तो पैसे वसूल करण्याचं टारगेट पहिल ठेवेलं. एका कफ सिरफने २२ मूल मेली होती त्याची तपासणीची जबाबदारी औषध निरीक्षकावर असते तर असे अधिकारी प्रामाणिक काम करतील का ? असा सवाल केला. तसेच रोहित पवार यांनी चॅटही दाखवण्यात आले. बार्शीचे कनेक्शन दिसून येत आहे. एक नायब तहसीलदारची मुलें आहेत. त्याच्या एका मुलाला १३ वा रँक आणि मुलीला १६ वा रँक आला आहे. आता हा योगा योग आहे का? हा प्रश्न आहे. यामध्ये बार्शी कनेक्शन आम्हाला कळलं आहे. काही मुलांनी एमपीएससी कडे तक्रार केली पण त्यावर कोणतेही उत्तर त्यांच्याकडून आले नाही. अधिकारी विद्यार्थ्यांना धमकी देतायत की तुमच्यावर पोलीस कारवाई करू असं रोहित पवार म्हणाले. तुकाराम मुंडे यांनी सकारात्मक रिप्लाय केला. मात्र त्यांच्या अधिकारात बऱ्याचशा गोष्टी नाहीत.सबंधित अकादमीचे फॉरेन्सिक ऑडिट करून कॉल रेकॉर्ड्स तसेच व्हॉट्सअप चॅट रीट्रीव्ह करून कारवाई करावी अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे. तसेच याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली.

### हे प्रकरण बाहेर आले कसे

नंदूरबारच्या कौटिल्य अकादमीतील एका विद्यार्थ्यांना ९० टक्के प्रश्न आधीच मिळाले होते. २२ मार्च २०२६ ला परीक्षा होती. पण २० मार्चलाच परीक्षेचे प्रश्न मिळालेले. त्यामुळे या मुलांना अभ्यास करता आला. पैसे मिळाल्यावर तो माणूस व्हॉट्स अपवर प्रश्न पाठवायचा. दोन ते तीन मिनिटांनी डिलिट फॉर ऑल करायचा. ते डाऊनलोड केलेले प्रश्न एकाने आपल्या मित्राला पाठवले. त्यामुळे त्याचे पुरावे आपल्याकडे आहेत असा दावा रोहित पवार यांनी केला आहे.



### आ.रोहीत पवारांनी घेतली एमपीएससी सिचिवांची भेट

आज मंगळवारी (दि.२८) आमदार रोहित पवारांनी औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्यासंदर्भात एमपीएससी चे सचिव यांची स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसोबत भेट घेऊन चर्चा केली आणि या पेपरफुटीच्या प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष तसेच फॉरेन्सिक तपासणी कालबद्ध मर्यादेत करण्याची आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत या भरती प्रक्रियेतील नियुक्त्यांना स्थगिती देण्याची मागणी केली आहे. यामुळे आ. रोहित यांनी हा पेपर फुटी प्रकरण हाती घेतल्याने त्यांचे विद्यार्थी व तरुणांमधून आभार मानले जात आहेत.

## सौर पंपाचा नुसताच गाजावाजा; अन् प्रत्यक्षात शेतकऱ्यांनो वाट बघा

### बीड जिल्ह्यात १० हजारांवर शेतकरी प्रतीक्षेत



**बीड । किसान न्युज**

जिल्ह्यातील तब्बल १० हजार २८४ शेतकरी रीतसर अर्ज आणि सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही महावितरणच्या प्रशासकीय व तांत्रिक गोंधळामुळे सौर कृषी पंपांच्या प्रतीक्षेत आहेत. शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी हक्काची वीज मिळावी या उदात्त हेतूने शासनाने ही योजना आणली, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीतील ढिसाळपणामुळे शेतकऱ्यांना मोठा आणि नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. या सौर पंपाची जाहिरात करुन नुसताच गाजावाजा अन् प्रत्यक्षात मात्र वाट बघा असे चित्र निर्माण झालेले दिसत आहे. जिल्ह्यात सौर पंप योजनेसाठी एकूण ७७ हजार ६१४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. पंप बसवण्यासाठी महावितरणने नियुक्त केलेल्या ६० एजन्सींचा निर्धारित कालावधी आता संपुष्टात येत असल्याने गावोगावची कामे पूर्णपणे रखडली आहेत. शासनाकडून आता नवीन निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून, प्रलंबित शेतकऱ्यांना नवीन नियुक्त कंपन्यांकडे वर्ग केले जाणार आहे. परिणामी, शेतकऱ्यांना आपला हक्काचा पंप मिळवण्यासाठी आणखी काही महिने ताटकळत राहावे लागणार आहे. अनेक » पान २ वर

## आपले सरकार सेवा केंद्र पोर्टलचे एकदाचं नामकरण करुन जाहिरात पोर्टल करा

### सेवा केंद्रावर सेवा पेक्षा पुढऱ्यांचे फोटोचं जास्त

**बीड । किसान न्युज**

**महाराष्ट्र शासनाच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र, मात्र सेवा केंद्रांवर शासनाच्या अधिकृत माहितीऐवजी राजकीय नेत्यांचे मोठे फोटो झळकू लागल्याने नागरिकांमधून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. हे सेवा केंद्र आहे की, सत्ताधारी पुढाऱ्यांचे जाहिरात पोर्टल असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. माहिती कमी आणि फोटोच जास्त असल्याने लोकांना माहिती द्या अशी मागणी करण्यात येत आहे.**

आपले सरकार सेवा केंद्रावर नागरिकांना आवश्यक असलेली माहिती, शासनाच्या योजनांची माहिती, विभागाचा लोगो, क्यूआर कोड आणि सेवा शुल्काची यादी दिसण्याऐवजी जर राजकीय व्यक्तींच्या छायाचित्रांना प्राधान्य दिले जात असेल, तर त्यामागचा उद्देश काय, असा सवाल जनतेतून केला जात आहे. सरकार बदलले, मंत्री बदलले किंवा खाते बदलले की, सेवा केंद्रांवरील फोटोही बदलले जातात. मात्र, सेवा, योजना आणि केंद्र पूर्वीप्रमाणेच असताना अशा बदलांची आवश्यकता काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शासनाची ओळख कोणत्याही व्यक्तीच्या छायाचित्राने नव्हे, तर नागरिकांना मिळणाऱ्या दर्जेदार आणि पारदर्शक सेवांमधून व्हायला हवी. त्यामुळे सेवा केंद्रांवर राजकीय ब्रँडिंग करण्यापेक्षा नागरिकांना आवश्यक माहिती अधिक ठळकपणे प्रदर्शित करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सेवा केंद्रांवर राजकीय व्यक्तींची छायाचित्रे लावण्याबाबत शासनाचे अधिकृत धोरण काय आहे, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## एमपीएससी 'ड्रग्स इन्स्पेक्टर' परीक्षा वादाच्या भोवऱ्यात

### महबूब शेख यांनी केली चौकशीची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**



महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या ड्रग इन्स्पेक्टर भरती परीक्षेच्या निकालानंतर राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शंका आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. निकालातील काही उमेदवारांच्या गुणांतील व क्रमवारीतील मोठ्या बदलामुळे परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख तसेच राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या FD- Chemi-cal -nalyst परीक्षेनंतर अवघ्या तीन महिन्यांनी, मार्च २०२६ मध्ये Drugs Inspector परीक्षा झाली. या दोन्ही परीक्षांच्या निकालांची तुलना करताना काही उमेदवारांच्या क्रमवारीत झालेली मोठी झेप अनेकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. पायल लांडे परीक्षेत ७२ गुण, रँक १०२१०; तर परीक्षेत रँक ३१., ऋतुजा अमृत पाटील परीक्षेत ९४ गुण, रँक २१२२२; तर परीक्षेत १५५ गुणांसह रँक ७, सागर रामलिंग थिटे परीक्षेत ९४ गुण, रँक २११६०; तर परीक्षेत १५० गुणांसह रँक १४.विद्यार्थ्यांच्या » पान २ वर

## आदेश असतानाही फेरफार नोंद घेण्यास टाळाटाळ

### केज तहसीलदारांवर आरोप करीत शेतकरी माय, लेकराचे उपोषण

**बीड । किसान न्युज**

केज तालुक्यातील सारणी येथील शेतकरी विष्णू प्रभाकर घोडके यांनी केजचे तहसीलदार अशोक नारायण भंडारे यांच्याविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. फेरफार प्रकरणाचा आदेश मंजूर होऊनही संबंधित नोंद होत नसल्याचा आरोप करत त्यांनी २७ जुलै पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले आहे. अर्जदाराने फेरफार प्रकरणासंदर्भात अनेक वेळा तहसील कार्यालयात पाठपुरावा करूनही आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचे म्हटले आहे. यामुळे न्याय मिळावा या मागणीसाठी त्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.




याच दरम्यान, काल रात्री उपोषणस्थळी तहसीलदार अशोक भंडारे यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी अरेरावीची भाषा वापरली व देवाचा बाप जरी आला तरी तुझं काम करत नाही, अशा शब्दांत » पान २ वर

## त्या अर्धनग्न अवस्थेत आढळलेल्या मृत महिलेची ओळख पटली; मुलगा आला समोर, तक्रार नाही



**बीड । किसान न्युज**

पालवण शिवारात एका महिलेचा अर्धनग्न अवस्थेत मृतदेह आढळला होता. त्या महिलेची ओळख पटली असून शहरातील गांधीनगर भागातील एकाने समोर येत माझी आई असल्याचा दावा केला. तसेच त्या भोळसर होत्या कुठे ही फिरत असत ८ ते १५ दिवस घरातून बाहेर राहत असत, यावेळी ही त्या आठवडा भरापासून गायब होत्या अशी माहिती दिली. तसेच माझी कोणाविरुद्ध ही तक्रार नाही असे सांगितले आहे. तर हा मयताचाच मुलगा आहे का ही खात्री करण्यासाठी सदरील इसमाची डीएनए टेस्ट करणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. रविवारी (दि.२६) सकाळी बीड शहरापासून जवळच पालवण शिवारात अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला होता. या महिलेचे नाव सुमनबाई गोरे (वय ५५ वर्ष) रा. गांधी नगर पेठ बीड असे असून त्या भोळसर होत्या, त्या घरातून ८ ते १५

## अभियांत्रिकीच्या प्रत्येक प्रवेश फेरीतील शुल्क अखेर सीईटी सेलने केली रद्द

बीड (किसान न्युज) : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६ – २७ च्या प्रवेशासाठी तंत्रशिक्षणाच्या अंतर्गत असलेल्या अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील प्रवेशाची पहिली फेरी २८ जुलै २०२६ पासून सुरू झाली असून संपूर्ण प्रवेश प्रक्रिया चार फेऱ्यात दिनांक १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत चालणार आहेत. केंद्रीभूत जागा शुल्काच्या रचनेत यंदापासून बदल करण्यात आला होता .नव्या नियमानुसार पहिल्या फेरीनंतर बेटरमेंट द्वारे नवीन जागा स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक फेरीत वाढीव शुल्क भरावे लागणार होते. प्रवेशासाठी चांगल्या महाविद्यालयाची प्रतीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांवर या निर्णयामुळे मोठा आर्थिक भार पडणार असल्याने या निर्णयाला विद्यार्थ्यांचा व पालकांचा विरोध होता. यापूर्वी पहिल्या फेरीत जागा स्वीकारण्यासाठी एक हजार रुपये भरल्यानंतर पुढील फेऱ्यांमध्ये अतिरिक्त शुल्क लागत नव्हते.मात्र आता पहिल्यांदा जागा स्वीकारताना एक हजार रुपये, दुसऱ्या फेरीत बेटरमेंट द्वारे नवीन जागा मिळाल्यास दोन हजार रुपये आणि तिसऱ्या फेरीत पुन्हा बेटरमेंट द्वारे नवीन जागा मिळाल्यास तीन हजार रुपये स्वतंत्रपणे भरावे लागणार होते. हे शुल्क परत मिळणार नव्हते. गुणवत्तेच्या » पान २ वर


स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट
141,500
२२ कॅरेट
134,000
चांदी प्रतिकिलो
225,000


## स्कूल बसमध्ये सीसीटीव्ही, व्हेईकल ट्रॅकिंग सक्तीचे अंबाजोगाई आरटीओ कडून अंमलबजावणी सुरू

**अंबाजोगाई । किसान न्युज**

**येथील उप प्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयाने महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम, २०२६ ची अंमलबजावणी सुरू केली असून, याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक व्यवस्थापनात अनेक महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. १६ जुलै २०२६ रोजी शासनाद्वारे जारी करण्यात आलेल्या नव्या अधिसूचनेनुसार, आता स्कूल बसमध्ये सीसीटीव्ही आणि व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस बसवणे अनिवार्य करण्यात आले असून, या सर्व सुरक्षा नियमांचे पालन करण्यासाठी वाहनधारकांना तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची वाढती सुरक्षा आणि डिजिटल यंत्रणेचा वापर या अनुषंगाने प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.**



शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांचे किमान भाडेदर आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहेत. प्राधिकरणाने निश्चित केलेल्या भाड्यापेक्षा प्रत्यक्ष दर हे केवळ दहा टक्के कमी किंवा जास्त असू शकतील. स्कूलबससाठी आकारले जाणारे दर या निश्चित दरपत्रकानुसारच असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी शालेय परिवहन समितीवर असेल. तसेच, वाहतूक सेवा, सुरक्षा आणि भाडे याविषयी पालकांची दर तीन महिन्यांनी एक विशेष » पान २ वर

## विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वतीने बीडमध्ये विजयी रॅली

**बीड । किसान न्युज**

वारंवार होत असलेल्या पेपर फुटीला कंटाळून दिल्ली येथे देशभरातील विद्यार्थी संघटनेच्या वतीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनि तत्काळ राजीनामा देऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातील विद्यार्थ्यांची माफी मागावी यासाठी ३२/३३ दिवस आंदोलन झाले हे सरकार विद्यार्थ्यांवर लाठीमार करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करू पाहत असताना विरोधी पक्ष नेते राहुल जी गांधी व देशभरातील काँग्रेस व समविचारी पक्ष आंदोलनात सहभागी होवून प्रत्येक वाडी वस्ती तांड्यावरील काँग्रेसचा कार्यकर्ता आंदोलनात सहभागी झाला. तेव्हा मात्र या सरकारच्या लक्षात आले आता मात्र आपली खैर नाही म्हणुन उशिरा का होईना देशवासीयांपुढे १२ वर्षात पहिल्यांदाच हे सरकार झुकले व शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. हा देशभरातील तरुणाईच्या एकजुटीचा व लोकशाहीचा विजय असल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रत्येक जिल्हात विजयी रॅली काढून विजयोत्सव साजरा करण्यात आला. बीडमध्ये देखील जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल » पान २ वर




CMYK